# पंचधारा


वर्ष ६९ वे, अंक पहिला

एप्रिल २०२६ ते जून २०२६

चैत्र ते ज्येष्ठ शके १९४८


## गोवा मुक्तिसंग्राम आणि साहित्य विशेषांक

Peer/Referee reviewed by UGC




मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : रु. १७५/-

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावेत.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

BHIM UPI
SCAN & PAY

पंचधारा वर्गणी Marathi Sahitya Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125
IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. १७५/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय .................................................................. ५

प्रस्तावना ........................................ डॉ. चिन्मय मधू घैसास ........ ७

श्रद्धांजली : आसावरी काकडे ................... विद्या मक्तल .................... ९

- गोवा मुक्तिसंग्रामातील बंडांचे
  ऐतिहासिक विश्लेषण ....................... प्राप्ती महेंद्र गांवकर ............ ११
- गोवा मुक्ती आंदोलन
  (पुस्तकाच्या प्रस्तावनेतील काही अंश) ... कै. मधुकर महाजन ........... १८
- गोमंतक स्वातंत्र्यलढा :
  चिकित्सात्मक अवलोकन .................. डॉ. सीमा रिसबूड ............. २१
- नगरहवेलीचा चित्तथरारक मुक्तिसंग्राम..... डॉ. विद्या देवधर .............. २६
- स्वातंत्र्यसेनानी बाकीबाब................... परेश वासुदेव प्रभू............. ३१
- गोवा मुक्तिसंग्रामातील वीरांगना :
  नेतृत्व आणि कर्तृत्व ........................ स्नेहा यशवंत देसाई........... ३९
- सतीचे वाण : एक ऐतिहासिक दस्तऐवज.. प्रा. विनायक ल. बापट ....... ४७
- गोवा मुक्तिसंग्रामाच्या ...................... रसिका केदार जोशी ........... ५५
  पार्श्वभूमीवरील आत्मचरित्रांचा.............. डॉ. चिन्मय मधू घैसास ...... ५५
  तुलनात्मक अभ्यास
- सुभाष भेण्डे यांच्या कादंबऱ्यांतील
  गोवा मुक्तिसंग्राम : एक अभ्यास .......... मानसी संजय शेट-मांद्रेकर ... ६०
- गोमंतकीय मराठी कथेतील
  गोवा मुक्तिसंग्रामाचे व तत्कालीन
  समाजवास्तवाचे चित्रण..................... डॉ. पूर्वा पंडित-वस्त ......... ६७
- १८ जून १९४६ आणि गोमंतकीय
  मराठी कादंबरी : एक अनुबंध ............. योगिता कालिदास चोडणकर . ७५

- पु. शि. नार्वेकर लिखित 'विघ्नहर्ता' कथासंग्रहातील पोर्तुगीजकालीन गोमंतकीय जीवन ........................... डॉ. भक्ती गोविंद महाजन .... ८४
- गोमंतकीय क्रांतीचे दर्शन घडवणारे ........ डॉ. चिन्मय मधू घैसास ...... ९०
  ऐतिहासिक नाटक 'शिवगोमंतक' .......... प्रा. ओंकार गोवेकर
- मुक्तिपूर्व गोमंतकातील महत्त्वपूर्ण सामाजिक दस्तऐवज : राजाराम पैंगीणकर यांचे आत्मचरित्र 'मी कोण?' ............. हेमंत बाळकृष्ण अय्या ....... ९६
- गोवा मुक्तिसंग्रामात......................... प्रा. भास्कर सुखदेव ढोके .. १०८
  मराठी साहित्यिकांचे योगदान :............ फणिंद्र रंगनाथ मंडलिक .... १०८
  एक चिकित्सकीय अभ्यास


## ग्रंथपरीक्षणे


- सुबोध योगवासिष्ठ : संक्षिप्त मराठी अनुवाद ...................... आसावरी काकडे ........... ११५
- कविता आणि मानवतावाद (Poetry and Humanism)............. प्रा. स्वाती हरिभाऊ काटे ... ११९
- घुबड - भेट, निरीक्षण आणि संवर्धनाची गरज ........................... राजेश्वरी किशोर ............ १२४


## कार्यवृत्त


- संघर्ष सूक्त ते वैभव गाथा : मराठी महाविद्यालय माजी विद्यार्थी संमेलन ...................... डॉ. कांचन जतकर.......... १२९
- भावनेशी सूर जुळता ....................... अरुण डवलेकर ............ १३२

स्वागत नव्या पुस्तकांचे........................................................ १३४

लेखक परिचय ................................................................. १३५

# गोमंतकीय क्रांतीचे दर्शन घडवणारे ऐतिहासिक नाटक ‘शिवगोमंतक’





**डॉ. चिन्मय मधू घैसास**    **प्रा. ओंकार गोवेकर**

गोमंतकीय स्वातंत्र्य चळवळीला जरी अठराव्या-एकोणिसाव्या शतकात सुरुवात झाली असली तरी त्याचे बीज मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकातच पेरले होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा सहसंबंध ‘शिवगोमंतक’ या नाटकातून श्री. विष्णू सूर्या वाघ यांनी स्पष्ट केला आहे.

विष्णू सूर्या वाघ हे विसाव्या शतकातील गोमंतकातील एक महत्त्वाचे साहित्यिक तथा राजकारणी म्हणून ओळखले जातात. गोव्यातील राजकारण, समाजकारण, साहित्य, लोकसाहित्य, धार्मिक परिप्रेक्ष्य आणि प्रसारमाध्यमे यांवर त्यांची पकड होती. गोव्याच्या इतिहासाचा, भूगोलाचा आणि वर्तमानाचा त्यांचा सखोल अभ्यास होता, तसेच त्यांच्या लेखनातही तो स्पष्टपणे जाणवतो. ‘शिवगोमंतक’ या त्यांच्या नाटकात शीर्षकाला अनुरूप कथानक आलेले आहे. तत्कालीन गोमंतकीय समाज, पाश्चात्त्य राजवटीमुळे गोमंतकीयांचा झालेला छळ आणि त्याला गोमंतकीयांनी केलेला तीव्र विरोध यांचे दर्शन या नाटकात घडते. गोव्यावरील पोर्तुगीजांची दीर्घकालीन राजवट, त्या राजवटीमुळे निर्माण झालेली सामाजिक-सांस्कृतिक दडपशाही आणि त्याविरुद्ध उभा राहिलेला गोमंतकीय जनतेचा संघर्ष यांचे प्रभावी चित्रण या नाटकात केलेले आहे. हे नाटक केवळ ऐतिहासिक घटना मांडत नाही, तर त्या घटनांमागील मानवी भावविश्व, अस्मिता, प्रतिकाराची भावना आणि स्वातंत्र्याची आस यांचे सखोल दर्शन घडवते.

‘शिवगोमंतक’ या शीर्षकातच नाटकाचा आशय दडलेला आहे. ‘शिव’ हा शब्द शक्ती, संहार आणि पुनर्निर्माण यांचे प्रतीक आहे, तर ‘गोमंतक’ म्हणजे गोवा. या शीर्षकाप्रमाणेच हे नाटक, ओजस्वी शक्ती असलेले छत्रपती शिवाजी महाराज, त्यांनी क्रूर निर्दयी पोर्तुगीज राजवटीचा केलेला संहार आणि त्यांच्या सहवासातून

गोमंतकीय जनतेत निर्माण झालेला स्वातंत्र्याचा हुंकार या मुख्य विषयांवर चर्चा करताना दिसते.

या नाटकाला सोळाव्या शतकाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६४ साली सिंधुदुर्गाची पायाभरणी केली आणि तेव्हापासून त्यांची आरमारे सुसज्ज झाली. दरम्यान पेडणे, सत्तरी आणि डिचोली हे तीन महाल (तालुके) मराठ्यांच्या ताब्यात होते मात्र फोंडा महालावर अदिलशहाची सत्ता होती. तथापि, या नाटकात शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ल्यावर केलेल्या मोहिमेची हकिकत स्पष्ट केली आहे. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी गोमंतकीय जनतेमध्ये जो स्वातंत्र्याचा वणवा पेटवला त्याची हकिकत सांगणारी ही साहित्यकृती आहे.

हे नाटक ऐतिहासिक पार्श्वभूमीवर लिहिलेले असले तरी त्याची रचना, पद्धत आणि मांडणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. नाटकातील गोमंतकीय लोकगीते तसेच पात्रांचे स्वभाव आणि पार्श्वभूमीनुसार येणारी त्यांची भाषा नाटकाला एक वेगळी ओळख निर्माण करून देते. नाटकाची सुरुवात ‘श्री धालोगे श्री धालोगे बाई धालानी खेळू या’ असे गीत म्हणत होते. या धालोगीताच्या माध्यमातून गोमंतकाची तत्कालीन परिस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न नाटककारांनी केला आहे. तथापि, हे धालोगीत फक्त गोमंतकीय संस्कृतीचे दर्शन घडवत नाही तर तत्कालीन परिस्थितीचे यथोचित चित्रण करण्यासाठी ते या नाटकात आलेले आहे.

नाटकाचा मूळ विषय छत्रपती शिवाजी महाराज आणि गोमंतक यांचा असलेला ऐतिहासिक संबंध स्पष्ट करणे हा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी नार्वे येथील श्रीसप्तकोटीश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला तेव्हाच शिवाजी महाराज आणि गोव्याचा संबंध आला असा गैरसमज अनेकांच्या मनात आहे. मात्र १६६४पासून वेगवेगळ्या निमित्ताने महाराजांचा संपर्क गोव्याशी येत होता. त्यातलीच एक घटना म्हणजे फोंडा किल्ल्यावरची चढाई. याच घटनेची दखल घेणारे आणि त्या घटनेची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे हे नाटक आहे.

नाटकाची सुरुवात लखम सावंत आणि विजरेई यांच्या संवादाने होते. या संवादाच्या माध्यमातून तत्कालीन काळात पोर्तुगीजांच्या उच्चारणामुळे गोव्यातील नामांचा अपभ्रंश कसा आणि का झाला याचाही प्रत्यय येतो. नाटकात वापरली गेलेली धालोगीते, पोवाडे, अभंग या बाबी नाटकाला आकर्षक बनवतात. नाटकाची कथा जसजशी पुढे जात जाते तसे अनेक ऐतिहासिक तपशील उलगडत जातात. छत्रपती शिवाजी महाराज गोव्यात का, कधी, कसे आले? त्यांचा आणि गोव्याचा

संबंध केव्हापासूनचा आहे? यांसारख्या अनेक प्रश्नांना साधार उत्तरे प्राप्त होत जातात. नाटकाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे गोव्यावरचे प्रेम आणि गोमंतकीयांच्या संदर्भात त्यांच्या मनात असलेला जिव्हाळा याचेही दर्शन होते. हे नाटक ऐतिहासिकदृष्ट्या जितके महत्त्वाचे आहे तितकेच पूर्वापार गोमंतकाची सांस्कृतिक ओळख स्पष्ट करण्याच्या दृष्टीकोनातूनही महत्त्वाचे ठरते.

'शिवगोमंतक' हे नाटक ऐतिहासिक विषयावर आधारित असले तरी या नाटकात सामाजिक, कौटुंबिक आणि राजकीय विषयही सहजपणे येतात. तत्कालीन कालखंडाची ऐतिहासिक दखल घेत असतानाच नाटककाराने तत्कालीन समाजाची परिस्थिती, मानसिकता आणि इतर अनेक विषयांना स्पर्श केलेला आहे. नाटकात अनेक प्रसंग आलेले आहेत ज्यांच्या माध्यमातून लेखकाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनाचा वेध घेतलेला जाणवतो. त्याचबरोबर काही प्रसंगांच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन समाजप्रवृत्तीवरही टीका केलेली आहे. इब्राहिम आणि मायनाक यांच्या संवादात येणारे 'फिरंग्या माणूस मराठीत लिहिता झाला' हे विधान अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रसंगाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन कालखंडात झालेल्या 'ख्रिस्तपुराण', 'पीटरपुराण' या ऐतिहासिक आणि धार्मिक ख्रिस्ती ग्रंथांचाही उल्लेख केलेला आहे. त्यात आलेली भाषा आणि संदर्भ यांविषयी भाष्य करत असताना ते म्हणतात, 'इब्राहिम, पोर्तुगीजांनी सक्ती करून लोकांचा धर्म बदलला, पण त्यांची संस्कृती ते कशी बदलणार? भाषा कशी बदलणार? शेवटी धर्मालाही लोकजीवनापुढे झुकावं लागतं. लोकांना हवं ते त्यांच्याच भाषेतून द्यावं लागतं.' धर्मावरून, जातीवरून आज समाजात भेदभाव निर्माण केला जातो, महामानव जातीपातीत वाटून घेतले जातात. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या पराक्रमी शूर योद्ध्याच्या चरित्रात डोकावून पाहिले तर त्यांच्या लेखी धर्म आणि जातीपेक्षा प्रवृत्तींना प्राधान्य दिलेले आपल्याला जाणवते. फोंडा किल्ल्याच्या चढाईवर असताना छत्रपती शिवाजी महाराज आणि चिटणीस यांच्यात झालेल्या संवादातून हा मुद्दा आपल्याला जाणवतो. 'हिंदवी राज्य म्हणजे केवळ हिंदूंचे राज्य नव्हे बहिर्जी! या भूमीत हिंदू राहतात तसे मुसलमानही राहतात. तेही पिढ्यान्‌पिढ्या. हिंदूंच्या संगतीने या मातीत त्यांचाही घाम गळतो. त्यांना आपण बाजूला कसे करणार?' ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुखी आलेली विधाने त्यांचा समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि सर्वधर्मसमभाव स्पष्ट करतात.

या व्यतिरिक्त मैनावतीने स्वराज्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याचा

घेतलेला निर्णय आणि 'मी जगेन तर स्वराज्यासाठी आणि मरेन तर स्वराज्यासाठीच' ही प्रतिज्ञा या नाटकात महत्त्वाची ठरते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या स्थापनेत गोव्यातील महिलांचेही योगदान होते हे सांगणारे हे पात्र आहे. नाटकाच्या शेवटी मैनावती थकून, तटस्थपणे आपला निर्णय सांगत असताना म्हणते की, 'काही स्वप्नं अशी असतात दर्यासारंग, की ती एखाद्याला जन्मभर वाट पाहायला लावतात. मीही एक स्वप्न पाहिलं होतं. गोमंतभूमीच्या मुक्तीचं. वाटत होतं, कधीतरी एक दिवस असा येईल ज्या दिवशी गुलामीचा कोंदटलेपणा दूर होईल आणि माझा वाघेरी मोकळा श्वास घेईल. कधीतरी एक क्षण असा उजाडेल की माझी म्हादय माता स्वतंत्र होईल. कदाचित नियतीची करणी असेल किंवा आपलाही पराक्रम कमी पडला असेल; तो दिवस अद्याप उजाडलेला नाही. तो उजाडत नाही तोपर्यंत मला एकटं राहणं भाग आहे दर्यासारंग.' या तिच्या वाक्यावरून तिचे बलिदान स्पष्ट होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी फोंडा किल्ल्यावर केलेल्या चढाईचा आलेख स्पष्ट करणारे हे नाटक आहे. शिवाजी महाराजांचे विचार, त्यांची बुद्धिमत्ता आणि निर्णयक्षमता या सगळ्याचा या नाटकाच्या माध्यमातून वेध घेता येतो. त्यांच्यामध्ये असलेल्या सर्वधर्मसमभाव वृत्तीचे दर्शन होते आणि देशद्रोह्यांविषयी त्यांच्या मनामध्ये असलेली चीड या नाटकाच्या माध्यमातून आपल्याला जाणवते.

'वरवर शांत वाटणाऱ्या या सागराच्या काळजात किती कळवळ माजली असेल कुणास ठाऊक. किती दुःख, किती शल्यं आपल्या आत साठवून ठेवली असतील त्यानं!' या त्यांच्या विधानाच्या माध्यमातून लेखकाने छत्रपतींच्या मनातील शल्य व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून हे नाटक फक्त एकच एक विषय मांडत नाही तर बहुआयामी दृष्टीकोन साकार करते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अनेक गोमंतकीय काम करत होते. स्वराज्य घडवण्यासाठी ज्या गोमंतकीयांचा हातभार लाभला त्या गोमंतकीयांचे प्रतिनिधित्व करणारे पात्र म्हणजे 'मैनावती'. हे पात्र काल्पनिक जरी असले तरी ते प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. या पात्राच्या तोंडी येणारे संवाद आणि दाखले नाटकाच्या विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी गोमंतकीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली आणि ती ज्योत तेवत ठेवण्यासाठी मैनावतीसारख्या अनेक महिलांनी आपले प्राण पणाला लावले. स्वातंत्र्यासाठी लढले, हुतात्मे झाले पण ज्यांचा उल्लेख मात्र कुठेच नाही अशा अगणित अनाम स्वातंत्र्यवीरांना आदरांजली अर्पण करणारे हे पात्र आहे. या पात्राच्या संवादाच्या माध्यमातून त्यांचा स्वराज्याप्रति असणारा समर्पण भाव आणि

गोमंतभूमीप्रतिचे क्रांतिकारी मत लक्षात येते.

तत्कालीन परिस्थितीचे दर्शन घडवत -

*सुख गेले वनवासा*
*भूमी आमची दुःखी गे*
*भूमी आमुची दुःखी गे*

या गीताने नाटकाची सुरुवात होते. मात्र, हे सांगत असताना नाटककार तत्कालीन गोमंतकीय समाजाच्या परिस्थितीचेही दर्शन घडवून देत असताना आपल्याला दिसतो. तो म्हणतो,

*दारातल्या तुळशी घे*
*पानां पान फुलसीगे*
*रानातल्या रानकिडी*
*तुळशी केसर खाशी घे*

गोमंतकीय लोकगीत 'धालो' आणि 'पोवाडा' यांचा आधार घेऊन नाटकाची रचना केलेली आहे. हे नाटक म्हणजे स्वराज्य आणि गोवा यांचा संगम साधणारे नाटक आहे त्यामुळे अशी रचना केली असावी.

गोमंतकीय जनतेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वाभिमान आणि स्वराज्यस्थापनेचे बीज पेरले होते. नाटकातील मैनावती हे पात्र तत्कालीन समाजातील पेटून निघालेल्या वर्गाचे प्रतिनिधित्व करते. हे पात्र स्वतः महाराजांच्या स्वराज्य या संकल्पनेने प्रेरित झालेले आहेच, तसेच ते इतरांनाही त्याबद्दल जागृत करण्याचे प्रयत्न करते. सुरुवातीला गावातील माणसे घाबरून त्याला विरोध करतात. मात्र, शेवटी गावकऱ्यांच्या मदतीने ते पात्र शत्रूच्या गोटात जाऊन तिथली माहिती प्राप्त करण्यात यशस्वी ठरते. मैनावती आणि मायनाक यांच्यातील सकारात्मक आणि दूरदृष्टी असलेल्या संवादातून नाटकाचा शेवट होतो. याद्वारे नाटककाराने प्रतीकात्मक रूपाने तत्कालीन गोमंतकीय समाजात सुप्तपणे जागृत झालेला स्वातंत्र्य चळवळीचा विचार स्पष्ट केला आहे.

नाटकाच्या सुरुवातीलाच येणाऱ्या लेखम सावंत आणि विजरेई यांच्या संवादातून पोर्तुगीज राजवटीचे मूळ उद्दिष्ट लक्षात घेता येते. विजरेई म्हणतो की, 'फिलदे पुत! लोखून सावंत तू काय मला मुसॉलमान समजिलास? फिदाल्ग... ही अशी कंबर आदिलशहा पुढे वाकवायची. माझ्यापुढे नाय! करायचा असेल तर सॅल्यूट कर.' असं म्हणत तो लखम सावंतला सन्मान देण्याची त्याची पद्धत बदलण्यास भाग पाडतो. पुढे तो लखम सावंतला म्हणतो की, 'लोखोम सावंत, तू

आणि तुझ्या बाकीच्या देसायांना किरीस्ता व्हावं लागेल.' या त्याच्या वाक्यावरून पोर्तुगीज राजवटीचे मूळ उद्दिष्ट स्पष्ट होते. त्यांनी गोमंतकात केलेले धर्मांतरण आणि गोमंतकीय संस्कृतीचे केलेले परिवर्तन नाटकात स्पष्टपणे दाखवलेले आहे. धर्मप्रसार करण्यासाठी त्यांनी इथल्या लोकभाषेचा आधार घेतला. इथल्या लोकसंस्कृतीला साजेल आणि इथल्या लोकांना आपलीशी वाटेल अशी ओवीबद्ध पद्धतीने मराठी ग्रंथरचनाही त्यांनी केली. वेळप्रसंगी इथल्या लोकसंस्कृतीत आणि समाजमनामध्ये आपला धर्म रुजवण्यासाठी त्यांनी सक्ती केली. सत्ता मिळवण्यासोबतच धर्मप्रसार करण्यासाठी त्यांनी गोव्यात राज्य केले आणि यालाच छत्रपती शिवाजी महाराजांनी विरोध केला होता.

'शिवगोमंतक' नाटकाच्या माध्यमातून लेखक विष्णू सूर्या वाघ यांनी सतराव्या शतकातील गोमंतकीय परिस्थितीचे वास्तवदर्शी चित्रण केलेले आहे. त्यांनी या नाटकाच्या माध्यमातून तत्कालीन गोमंतकीय समाज आणि परिस्थिती प्रेक्षकांसमोर उभी केलेली आहे. आपल्या राजवटीचे मूळ उद्दिष्ट यशस्वी करण्यासाठी पोर्तुगाली लोकांनी केलेले क्रूर अमानुष कृत्य या नाटकात दिसते. हे नाटक फक्त ऐतिहासिक घडामोडींचे दर्शन घडवत नाही तर त्यावर प्रतीकात्मक रूपाने भाष्यही करते. लेखकाने, तत्कालीन समाजाला पडलेल्या प्रश्नांचे दर्शन घडवले आहे तसेच समाजात निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्रण केले आहे. एकंदरीत, स्वराज्यकालीन गोमंतकाचे दर्शन घडवणारे आणि गोमंतकीयांच्या मातृभूमीच्या मुक्तीसाठीची अस्मिता आणि लढा यांचे यथार्थ चित्रण करणारे महत्त्वाचे ऐतिहासिक नाटक म्हणून 'शिवगोमंतक' या नाटकाची निश्चित दखल घ्यावी लागते.

■